ठाणे महानगरपालिका, ठाणे.

वृक्षप्राधिकरण

जाहीर सुचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन नियम २००९ मधील तरतुदीनुसार आणि मा. मुंबई उच्च न्यायालय जनहित याचिका क्र. ११९/२०१७ मधील सूचित आदेशानुसार मा. मुंबई उच्च न्यायालय जनहित याचिका क्र. ९३/२००९ मध्ये विहित केलेल्या निकषांनुसार वृक्षप्राधिकरणात नामनिर्देशित कमाल सहा सदस्यांची नेमणूक करण्यासाठी खालील पात्रताधारकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. वृक्षप्राधिकरणावर अशासकीय संस्थेचा प्रतिनिधी म्हणून नियुक्त होण्यास नामनिर्देशित व्यक्ती शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत अशासकीय संस्थेचा सक्रीय सदस्य असेल तसेच तिला वृक्षलागवड व संवर्धन आणि वृक्ष संरक्षण इ. मध्ये रुची असेल.

२. वृक्षांचे रोपण, जतन, पुनर्रोपण किंवा पर्यावरण संवर्धन, क्षेत्रातील विशेष ज्ञान व किमान दहा वर्षांचा समृध्द अनुभव असावा.

३. एका अशासकीय संस्थेचा एकच प्रतिनिधी नामनिर्देशित होण्यास पात्र राहिल.

४. कृषि/ वन/ उद्यान विद्या शास्त्राची पदवी किंवा पदविका असणाऱ्यांना प्राधान्य.

५. राष्ट्रीय पातळीवर कार्यरत अशासकीय संस्थेच्या प्रतिनिधीस प्राधान्य

उपरोक्त पात्रता असणाऱ्या प्रतिनिधींनी संपूर्ण माहितीसह आवश्यक कागदपत्रांसह अर्ज मुदतीत सादर करणे आवश्यक राहिल. अर्जदार यांनी पात्रता धारण करत असल्याबाबत अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले असणे बंधनकारक राहिल. सदर कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह अर्ज बंद लिफाफा मध्ये नागरी सुविधा केंद्र, तळ मजला, महापालिका भवन, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे (प.) ४००६०२ येथे कार्यालयीन वेळेत सदरची सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि. ०८/०६/२०१८ पर्यंत कार्यालयीन कामकाजाचे दिवसांत सादर करण्यात यावेत. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या तसेच अपुरी पात्रता-कागदपत्रे सादर केलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. अपात्र ठरणाऱ्या तसेच पात्र होऊनही नामनिर्देशित होणार नाहीत अशा उमेदवाराशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदरची सूचना ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(संजीव जयस्वाल)
महापालिका आयुक्त,
अध्यक्ष, वृक्षप्राधिकरण,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

Scanned by CamScanner